# ई - पोलीस पत्रिका

दिनांक २९/१०/२०२४ अनु.क्र.१९७

### (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-१/पोनि/पदोन्नतीवर हजर/८९००/२०२४ अमरावती शहर दिनांक ०८/१०/२०२४**

## आदेश

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशक्रमांक पोमसं/३/११/६ निवडसूची २०२२-२३/१९२/२०२२ दिनांक १३/०९/२०२४ अन्वयेखालील नमुदसहायकपोलीस निरीक्षक यांची पोलीस निरीक्षक पदीपदोन्नतीने पदस्थापनात्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणीकरण्यात आली आहे.

| अ. क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीसनिरीक्षक यांचे नाव | पदोन्नती पूर्वीची नेमणूक व कार्यमुक्त दिनांक | पदोन्नतीचे ठिकाण व हजर दिनांक व नेमणूक |
|---|---|---|---|---|
| ३ | २ | श्री रामदास छबुराव पालवे | बीड शहर येथुन दि. २४/०९/२०२४ रोजी म.नं कार्यमुक्त | पोलीस आयुक्त, अमरावती शहर येथे दि. ०४/०९/२०२४ रोजी म. नंतरहजर **नेमणूक - पो.स्टे. राजापेठ दुय्यम अमरावती शहर** |

श्रीरामदास पालवे, पोलीस निरीक्षक यांचादि. २५/०९/२०२४ ते०३/१०/२०२४ पर्यंत ९ दिवसांचा कालावधी हाम.ना.से. (पदग्रहण अवधी) नियम १९८७ मधील नियम १५ अन्वये पदग्रहण अवधी म्हणूनमंजूरकरण्यात येत आहे.

श्री रामदास पालवे, यांनापोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकात पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर हजर करुन घेण्यात येत असून त्यांनी नेमणुकीचे ठिकाणी तात्काळ हजर होऊन त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/गैरहजर/कसुरी/अहवाल/अंतिम आदेश/पोहवा-१८८ यादव/८२६७/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/०९/२०२४**

**संदर्भ क्रमांक** :- १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २६६८/दिनांक २८/०९/२०२३ रोजीचा गैरहजर कसुरी अहवाल.

२) या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/आज्ञांकित कक्ष/ १००/२०२३, दिनांक ३१/१२/२०२३

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोआअ/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल/पोहवा -१८८ यादव/४२२३/२४ दिनांक ०३/०५/२०२४

४) या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअश/विचौ-२/गैरहजर/कसुरी अहवाल/का.दा.नो./पोहवा-१८८ यादव/६०८७/२०२४, दिनांक ०३/०७/२०२४

**कसुरदारचे नाव :-** पोहवा/१८८ संतोष यादव, नेमणुक पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे कर्तव्य नेमण्यात आलेले होते.तरी तुम्ही वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहिले असुन तुम्ही पोलीस विभागा सारख्या शिस्तप्रिय पोलीस खात्यात लोकसेवक असल्याचे कोणतेही भान न ठेवता अत्यंत बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केलेले आहे. तुम्हाला वरिष्ठांनी नेमुन दिलेले कर्तव्य व्यवस्थीत पार न पाडता कर्तव्यावर गैरहजर राहता.तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दला मध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.तसेच कसुरीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक ३१/०१/२०२४ रोजी मा.पोलीस उपायुक्त (मुख्या.), अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर झाले नाही.तुम्हाला पुन्हा वरील संदर्भीय क्रमांक ०३ अन्वये दिनांक १५/०५/२०२४ पर्यत गैहरजरीबाबत खुलासा सादर करणेबबत संधी देवुन सुध्दा तुम्ही तुमचा गैरहजरी बाबत आजपावेतो खुलासा सादर केला नाही.

| अ.क्र | नाव व पदनाम | नेमणुक ठिकाण | थोडक्यात कसुरी |
|---|---|---|---|
| १ | पोहवा/१८८ संतोष यादव | पो.स्टे. नागपुरी गेट.अम.शहर | पोलीस मुख्यालय, अम.शहर येथे संलग्न असतांना दिनांक २५/०८/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे गणणा ०१ दिवस गैरहजर राहिले. |

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त)** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये ? म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पत्र क्र.६८५९/२०२४, दिनांक ३०/०७/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर करणे करीता पत्राव्दारे एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नाही.तरी कारणे दाखवा प्रस्तावीत नोटीस मध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त) दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**०१.पोआअ/आस्था-वेनिलि/पदोन्नती/पोना ते पोहवा/९४५५/२०२४ अमरावती शहर दिनांक २५/१०/२०२४**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांची या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-प्रलि/पोना ते पोहवा पदोन्नती/८९०३/२०२४, दि.०८.१०.२०२४ अन्वये पोलीस नाईक ते पोलीस हवालदार (अराजपत्रीत गट-क) या पदावर पदोन्नती झाल्याने त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ (१) (अ) तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम २०१९ मधील नियम १३ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती पुढीलप्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | वेतन रु. २५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | वेतन रु.२६४०० -८३६००/- |

**१. पोलीस नाईक /४३७, मंगेश मनोहर लोखंडे , नेमणूक पो.स्टे.नागपुरी गेट, अमरावती शहर**

| तपशिल | सुधारीत वेतन स्तर मधील वेतन व वेतनवाढीचा दिनांक |
|---|---|
| पोलीस नाईक पदावरील **वेतनस्तर एस-८** मधील दि.०१.०७.२०२४ चे वेतन | रु. ३९८००/- |
| दिनांक ०८.१०.२०२४ अन्वये पोना पदावरुन पोहवा पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर **वेतनस्तर एस-८** मध्ये मानीव वेतनवाढ | रु.४१०००/- |
| पोलीस हवालदार या पदोन्नतीचे **पदावर वेतनस्तर एस-९** मध्ये नियम ११ (एक) (ए) नुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती. | रु.४११००/- |

**२. पोलीस नाईक /४१५, विकास अंबादास यादव, नेमणूक पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर**

| तपशिल | सुधारीत वेतन स्तर मधील वेतन व वेतनवाढीचा दिनांक |
|---|---|
| पोलीस नाईक पदावरील **वेतनस्तर एस-८** मधील दि.०१.०७.२०२४ चे वेतन | रु. ३९८००/- |
| दिनांक ०८.१०.२०२४ अन्वये पोना पदावरुन पोहवा पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर **वेतनस्तर एस-८** मध्ये मानीव वेतनवाढ | रु.४१०००/- |

| | |
|---|---|
| पोलीस हवालदार या पदोन्नतीचे **पदावर वेतनस्तर एस-९** मध्ये नियम ११ (एक) (ए) नुसार पदोन्नतीच्या पदाची वेतननिश्चिती. | रु.४११००/- |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस